**नि. फौ. खटला क्र.११५/२०२४**

**निशाणी क्र.२०**

**:: अभियोग पक्षातर्फे सा.क्र.०१ चा पुरावा ::**

**शपथेवर सत्य निवेदन करतो की,**

**माझे नांव** : मोहनेश्वर पांडुरंग पांचाळ,

**वय** : ३७ वर्षे, **काम** : व्यापार,

**राहणार** : वलांडी, ता. देवणी, जि. लातूर.

**:: अभियोग पक्षातर्फे सरतपासणी सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. एस.एम. हाशमी यांचेमार्फत ::**

मी आरोपींना ओळखतो. ते न्यायालयामध्ये हजर आहेत. दि.२६/१०/२०२४ रोजी दुपारी २.३० वाजता वलांडी–कवठाळ रस्त्यालगत शेत सर्वे क्र.५० मध्ये घटना घडली होती. त्यादिवशी मी दुकानात असताना माझ्या आईने फोन केला आणि तिन्ही आरोपींनी तिला आणि वडिलांना शिवीगाळ करून मारहाण केल्याचे व सोयाबीनचा ट्रॅक्टर अडविल्याचे सांगितले होते. त्यानंतर मी, माझा भाऊ परमेश्वर आणि आकाश कलबुर्गे असे मिळून शेतात गेलो होतो. त्यावेळी आरोपींनी सोयाबीनचा ट्रॅक्टर अडविला होता. मी त्याबाबत आरोपी शिवाजीला विचारले असता त्यांनी मला शिवीगाळ केली, माझ्या वाट्याला हालकी जमीन दिली असे म्हणून दगड उचलून माझ्या डोक्यात मारला. त्यामुळे माझ्या डोक्यातून रक्त आले आणि मी खाली पडलो. त्यावेळी ज्ञानेश्वर हा माझ्या छातीवर बसला आणि मला दगडाने मारहाण केली. त्यावेळी माझी आई, वडील व भाऊ परमेश्वर यांनी ज्ञानेश्वरला बाजूला केले. त्यावेळी शिवाजी पांचाळ के शिवीगाळ करून लागले. माझ्या वडिलांनी असे का करता विचारले, वाटणीला चाळीस वर्षे होऊन गेले आता वाटणीचे का बोलाता असे म्हटले. त्यावेळी आरोपी सुधाकरने माझ्या वडिलांना शिवीगाळ केली आणि वाटणी चांगली नाही दिली तर जिवांशी मारतो अशी धमकी दिली. माझे आईवडील आणि भाऊ यांनी मला गाडीने पोलीस ठाण्यामध्ये नेले. पोलिसांनी मला दवाखान्यात जाण्यासाठी पत्र दिले. त्याप्रमाणे मी सरकारी दवाखाना देवणी येथे गेलो. त्यानंतर मला पुढील उपचारासाठी उदगीर येथील दवाखान्यात पाठविले होते. मला त्रास जास्त असल्याने उदयगीरी हॉस्पीटल उदगीर येथे दाखविले. मी तेथे चार दिवस उपचार घेतला. त्या दरम्यान दि.२९/१०/२०२४ रोजी पोलिसांनी माझा तेथे जबाब नोंदवला. आता मला जबाब दाखविला. हा तोच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यामधील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.२१** देण्यात येते. आता मला मुद्देमाल क्र.०१/२०२६ मधील दोन दगड दाखविले. हे तेच आहेत. ते गुन्ह्यात वापरलेले आहेत. त्यामधील

काळसर दगडाला **वस्तूचिन्ह अ** आणि तांबड्या दगडाला **वस्तूचिन्ह ब** देण्यात येते.

सरतपास पूर्ण.

:: आरोपीकरिता उलटतपास अधिवक्ता श्री. एम.बी. पाटील यांच्यामार्फत ::

०२. मी आणि आरोपी एकाच भावकितील आहोत. दत्तात्रय निडबने व लक्ष्मण देवंग्रे हे माझे शेजारी आहेत. साक्षीदार पुन्हा सांगतो की, लक्ष्मण देवंग्रे हे माझे शेजारी नाहीत. ते माझ्या परिचयाचे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, आकाश कलबुर्गे हा माझ्या दुकानात काम करणारा व्यक्ती आहे. चंद्रकला पांचाळ आणि पांडुरंग पांचाळ हे माझे आई व वडील आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी आणि आमच्यामध्ये शेतीच्या वाटण्यावरून व रस्त्यावरून वाद आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या शेतामध्ये जाण्यासाठी आरोपींच्या शेतातून जावे लागते. हे म्हणणे खरे नाही की, गाव नकाशाप्रमाणे आम्हाला आरोपींच्या शेतातून रस्ता नाही.

०३. सोयाबीनच्या राशीच्या वेळी शेतामध्ये मजूर असतात. नमूद घटनेच्या दिवशी आजूबाजूच्या शेतात मजूर हजर असतील. मजुरांनी माझ्या शेतातील रास ट्रॅक्टरमध्ये चढविली होती. परंतु मजूर घटनास्थळी हजर नव्हते. ट्रॅक्टर माझ्या गावातील होता. परंतु त्याचा मालक आणि क्रमांक मला सांगता येत नाही. माझ्या शेता शेजारी भगवान कारभारी, बाळू कारभारी, शिवराज हणमंते, लिंबराज हणमंते व आरोपी शिवाजी पांचाळ यांची शेती आहे. माझी पोलिसांसोबत जबाब नोंदविते वेळी दवाखान्यामध्ये आणि त्यानंतर दगडे पडताळणीच्या वेळी भेट झाली होती. दगड पडताळणीचा वजा ओळखीचा पंचनामा माझ्यासमक्ष झाला नव्हता. पोलिसांनी मला दगड दवाखान्यामध्ये आणून दाखविले होते.

०४. मी दवाखान्यात चार दिवस उपचार घेतला. त्यानंतर मी घरी गेलो. डॉक्टरांनी फक्त मला तपासले होते. हे म्हणणे खरे आहे की, शेतामध्ये आणि बांधावर भरपूर दगड आढळतात. माझे रक्ताने माखलेले कपडे पोलिसांना दिले होते. साक्षीदार पुन्हा सांगतो की, रक्ताने माखलेले कपडे दवाखान्यात दिले होते, परंतु पोलिसांना दिले नव्हते.

मी देवणी येथील दवाखान्यात गेलो त्यावेळी मला शुध्द नव्हती त्यामुळे मी डॉक्टरांना दुखापतीच्या कारणाबाबत सांगितले नाही. मी शुध्दीवर आल्यानंतर डॉक्टरांना दुखापतीच्या कारणाबाबत सांगितले नाही.

०५. हे म्हणणे खरे नाही की, दि.२६/१०/२०२४ रोजी दुपारी ३.३० वाजता मी, माझे आईवडील आणि परमेश्वर यांनी शिवाजी बांधावर म्हैस चारत असताना त्यास मारहाण केली होती. हे म्हणणे खरे नाही की, शिवाजीची सहा, सात, आठ व नऊ क्रमांकाच्या बरगड्या फ्रॅक्चर झाल्या होत्या आणि फुफुसामध्ये पाणी साचले होते. शिवाजी लातूर येथील दवाखान्यात पंधरा दिवस भरती होता याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी पोलिसांना मॅनेज केले आणि शिवाजीने वारंवार खबर देऊनसुध्दा त्याची दखल घेण्यापासून परावृत्त केले. हे म्हणणे खरे नाही की, मी शिवाजीला शेतातून रस्ता का देत नाही या कारणावरून मारहाण केली होती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी सुधाकर याचा माझ्याशी किंवा माझ्या शेताशी कोणताही संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही केवळ संगनमताने सुधाकरचे नाव प्रकरणामध्ये गुंतविले. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी रस्ता देत नसल्यामुळे त्यांच्याविरुध्द माझ्या मनामध्ये राग आहे. हे म्हणणे खरे नाही की, घटना घडलेली नसताना मी खोटा जबाब दिला आणि खोटी साक्ष दिली. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात संपूर्ण मजकूर खोटा कथन केला व त्याप्रमाणे कोणतीही घटना घडली नाही.

उलटतपास पूर्ण.
फेरतपास नाही.
श्रवणोत्तर स्वीकृत सा.वा.दा.ख.व.ब.अ.क.केले.

( श.अ. सुरजुसे )
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, **दे व णी**.
दि.२५/०३/२०२६.

( श.अ. सुरजुसे )
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, **दे व णी**.